गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करावा - महापौर वंदना मगरे

## शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहात संपन्न; शाहिरी कडाडली आणि अंगावर शहारे उमटले..!; गुरुवारी शाहिरी शिवदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जालना शहरात दि.१८ आणि १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यात शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाचा जागर होणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून शिवकालीन इतिहास पुन्हा एकदा जिवंत करण्याचा प्रयत्न आहे. जालनेकरांनी या दोन दिवसीय सांस्कृतिक मेजवाणीचा लाभ घ्यावा. तसेच आजच्या पिढीने शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करावा, असे प्रतिपादन महापौर वंदना मगरे यांनी केले आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ फ `ब्रुवारी, २०२६ रोजी जालना येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य कर्तृत्व व शौर्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जालना येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, शिवजन्मोत्सव सोहळा अध्यक्ष विश्वंभर तिरुखे, सामाजिक कार्यकर्ते अरविंद देशम ुख, अशोक पडूळ, किशोर मरकड, तहसीलदार छाया पवार, नायब तहसीलदार पान ३ वर







युवा आदर्श

## राजे ...

अखर्वात महा पुरुष
जन्मे शिवबा अनुप
आऊंची सुवर्ण कूस
उपकार अनन्य खूप
राज्याभिषेक संपन्न
स्वराज्यां स्वत्व रूप
आऊ तुझ्या स्वप्नांस
ग लाभले मूर्तस्वरुप
मद मस्त औरंगजेब
मुगलतख्त चिडीचूप
चपराक अत्याचारा
शमले क्रौर्य ते विद्रुप
मावळा होई बावळा
भगव्या स्थान अप्रुप
सुनियोजितस्वराज्य
प्रयासेबनवले प्रारुप
आले दिवस सुखाचे
रयत नांदते सुखरुप
बळीराजा सुखावला
माय मातीला हुरुप
माझे हक्काचे राज्य
वाटे मावळ्या अप्रुप
न्याय समता सहिष्णु
मिटे समस्या घडधूम
स्वराज्यकरू सुराज्य
जनता जाहली तद्रप
अंबाभवानी धन्यवाद
दिला राजा सुस्वरूप
शब्द तोकडे वर्णाया
शिव कर्तृत्व अनिरुप
पेलण्यासाठी भगवा
निदान होऊ अनुरूप

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# प्रशासनाच्या कडक भूमिकेमुळे बारावीच्या परीक्षा कॉपी मुक्त सुरु

## उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या केंद्रांना सतत भेटी

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षांचे पावित्र्य राखण्यासाठी परतूर विभागात 'कॉपीमुक्त अभियान' राबवण्यात येत आहे. प्रशासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या कठोर निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली असून, त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. परतूर आणि तालुक्यातून बारावीच्या कॉपी मुक्त परीक्षांबाबत अत्यंत सकारात्मक वातावरण पाहायला मिळत आहे. प्रशासनाने घेतलेल्या कडक भूमिकेमुळे यंदाच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत आहेत. यासाठी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड,



तहसीलदार दामोधर जाधव हे स्वतः विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देत आहेत. यामुळे केंद्र संचालक आणि पर्यवेक्षकांवर वचक निर्माण झाला आहे. केवळ स्थानिक प्रशासनच नव्हे, तर शिक्षण विभागाची विशेष भरारी पथके देखील सक्रीय आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी करण्यात आली असून, झेरॉक्स सेंटरवरही लक्ष ठेवण्यात येत आहे.

'कॉपीमुक्त' अभियानाचा प्रभाव

यावर्षी कॉपी मुक्त परीक्षा मुले प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये यामुळे विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढताना दिसून येत आहे. परीक्षा केंद्रांवर सकाळी प्रवेशापासूनच शिस्तबद्ध तपासणी केली जात आहे. प्रशासनाच्या या 'ॲक्शन मोड'मुळे शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता वाढण्यास मदत होत आहे. प्रशासनाच्या या मोहिमेमुळे परतूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण अशा पान ३ वर

# जेईई परीक्षेत जालन्यातील आयन खंडेलवालचे घवघवीत यश

## कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते स्वागत



**जालना । प्रतिनिधी -** जेईई परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत जालन्यातील आयन खंडेलवाल या विद्यार्थ्याने ९९.0३ पर्सेंटाईल गुण प्राप्त करत घवघवीत यश मिळवले आहे. जालन्यातील आरपी रोडवरील रहिवाशी असलेले सामाजिक कार्यकर्ते चेतन खंडेलवाल यांचे आयन हे चिरंजीव असून लहान पणापासून त्याने अभ्यासावर लक्ष केंद्रित केले आहे. नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यास करून आयन याने हे घवघवीत यश मिळवले आहे.जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी बुधवारी सायंकाळी पान ३ वर

## खडकपूर्णा प्रकल्प पाणी आणि विविध विकास कामाचे आ.संतोष दानवे यांच्या हस्ते उदघाटन

# टेंभुर्णी चा पाणी प्रश्न कायमचा निकाली



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** गेल्या कित्येक वर्षा पासून टेंभुर्णी चा पाणी प्रश्न गंभीर झाला होता.एका बाजूला जिवरेखा धरण आणि दुसरी कडे खडकपूर्णां प्रकल्प असून टेंभुर्णी येथे १० दिवस १५ दिवस होऊन सुद्धा पाणी भेटत नसल्यामुळे टेंभुर्णीची जनता कमालीची नाराज होती. या वेळी अनेक विकास कामाची उद्धाटन आणि लोकार्पण सोहळा संपन्न झाल्याने अनेक समस्या निकाली लागल्या आहे. या मध्ये विशेष म्हणजे शिवाजी नगर ते खालील मुख्य बसस्थानक रोड ते दत्त नगर येथील वेस पर्यंत समिटी रोड या विकास कामात असल्याने या रोड ची समस्या बऱ्याच वर्षा पासून प्रलंबित होती.या वेळी मंचकावर आमदार संतोष दानवे यांच्या सह शालिकराम म्हस्के मुकेश पांडे दीपक वाकडे गोविंदराव पंडित भिकन पठाण मनोज पंडित विजू परिहार सर्जेराव शिंदे फैसल चाऊस शिवाजी मुळे दत्तू पंडित यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

टेंभुर्णी येथील मध्यभागी असलेल्या भाजी मंडी येथे हा कार्यक्रम पार पडला.या लोकार्पण सोहळा प्रसंगी सर्जेराव शिंदे संजय राऊत शालीकराम म्हस्के यांनी या वेळी आपले मनोगत व्यक्त केले.या वेळी म्हस्के यांनी गावातील राहिलेल्या विकास कामाची यादी मोठी असून तिचा ही विचार करून आमदार फंडातून सगळे कामे केल्या जाईल असे आश्वासन दिले. गावातील नालीतील वाहणारे पाणी रोडवर जात असल्याने ही समस्या कायम होती ही गंभीर बाब असल्याने पुन्हा नवीन नाली योजना पूर्ण होऊन सगळे सांड पाणी खोल नाल्यातून बाहेर पान ३ वर



# संपादकीय



## पत्रकार संरक्षण कायदा आणि एकजुटीचा संदेश; जालना प्रकरणाचे व्यापक परिणाम

जालना येथे पत्रकारावर झालेल्या धक्काबुक्की व धमकीच्या घटनेनंतर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होणे ही केवळ एका व्यक्तीची न्यायप्राप्ती नसून, पत्रकारितेच्या सुरक्षिततेसाठी उभ्या राहिलेल्या सामूहिक संघर्षाचे प्रतीक आहे. पत्रकार भरत मानकर यांच्यावर झालेल्या घटनेनंतर सुरुवातीला गुन्हा दाखल होण्यास झालेला विलंब आणि त्यानंतर पत्रकार संघटनांच्या दबावामुळे प्रशासनाने घेतलेली तातडीची दखल, या दोन्ही बाबी पत्रकारांच्या सुरक्षेच्या संदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित करतात.

**आंदोलनामुळे प्रशासनाची हालचाल - लोकशाहीतील सकारात्मक संकेत**

या प्रकरणात प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांनी दाखविलेली एकजूट निर्णायक ठरली. पत्रकारांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये अनेकदा तक्रारी असूनही गुन्हे दाखल होण्यास विलंब होतो, ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही. मात्र या वेळी आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासनाने तातडीने भूमिका घेतली, हे लोकशाही व्यवस्थेतील उत्तरदायित्वाचे सकारात्मक उदाहरण म्हणता येईल.

**पत्रकार संरक्षण कायद्याचा प्रत्यक्ष वापर - महत्त्वाचा टप्पा**

महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम २०१७ अंतर्गत गुन्हा दाखल होणे ही महत्त्वाची बाब आहे. हा कायदा अस्तित्वात असला तरी त्याची अंमलबजावणी अनेकदा प्रभावीपणे होत नसल्याची टीका होत असते. जालना येथील हा प्रकार पत्रकारांवर होणाऱ्या दबाव, धमक्या आणि शारीरिक हल्ल्यांविरोधात कायदा प्रत्यक्षात वापरला जाऊ शकतो, असा स्पष्ट संदेश देणारा आहे.

**पत्रकारांवरील हल्ले - वाढती चिंतेची बाब**

पत्रकार हा समाज आणि प्रशासन यांच्यातील दुवा असतो. सार्वजनिक कामकाजाची माहिती घेणे, प्रश्न विचारणे आणि जनतेसमोर सत्य मांडणे ही त्याची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत माहिती घेत असताना पत्रकारांवर शिवीगाळ, धमकी किंवा हल्ला होणे हे केवळ एका व्यक्तीवरचे आक्रमण नसून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच घाला घालणारे आहे. जर अशा घटनांवर कठोर कारवाई झाली नाही, तर भविष्यात पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**तपासाची पारदर्शकता आणि साक्षीदारांची भूमिका**


गुन्हा दाखल होणे ही प्रक्रियेची सुरुवात आहे; अंतिम न्याय मिळविण्यासाठी निष्पक्ष आणि सखोल तपास अत्यावश्यक आहे. तपास अधिकारी आणि साक्षीदार यांची भूमिका येथे निर्णायक ठरणार आहे. दबाव, तडजोड किंवा राजकीय हस्तक्षेप यांना बळी न पडता सत्य समोर येणे गरजेचे आहे. अन्यथा अशा प्रकरणांचा परिणाम केवळ प्रतीकात्मक राहण्याचा धोका असतो.

**पत्रकार एकजूट - भविष्यासाठी दिशादर्शक**

या प्रकरणातून सर्वात मोठा संदेश म्हणजे पत्रकारांची एकजूट. विविध संघटना, विविध विचारधारा आणि विविध माध्यमातील पत्रकार एकत्र आले, तेव्हाच प्रशासनाला तातडीने निर्णय घ्यावा लागला. हीच एकजूट कायम राहिली, तर पत्रकारांवरील अन्यायाविरोधात प्रभावी लढा उभा राहू शकतो.

दीपक शेळके यांनी व्यक्त केलेली भूमिका - पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने लढा देण्याची - ही केवळ प्रतिक्रिया नसून पत्रकार सुरक्षेच्या व्यापक आंदोलनाची सुरुवात ठरू शकते. पत्रकारांना संरक्षण, सन्मान आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही लोकशाहीच्या सुदृढतेची पूर्वअट आहे. जालना येथील घटना ही एक इशारा आणि एक संधी दोन्ही आहे. इशारा असा की पत्रकारांवरील हल्ले अजूनही वास्तव आहेत; आणि संधी अशी की कायदा, संघटनात्मक एकजूट आणि लोकशाही दबाव यांच्या माध्यमातून न्याय मिळवता येतो. आता गरज आहे ती अशा प्रत्येक प्रकरणात तातडीने आणि निष्पक्ष कारवाई करण्याची. कारण पत्रकार सुरक्षित असतील, तरच समाजाला सत्य सुरक्षितपणे मिळू शकते.

## फाल्गुन शु. द्वितीया या दिवशी असलेल्या रामकृष्ण परमहंस जयंती निमित्त कालीमातेचे महान उपासक रामकृष्ण परमहंस!




रामकृष्ण परमहंस म्हणजे गदाधर यांचा जन्म बंगालमधील कामारपुकुर या गावात फाल्गुन शु.द्वितीय ीवर्ष १८३६ मध्ये झाला. गदाधरच्या वडीलांचे नाव क्षुदिराम चतर्जी, आईचे नाव चंद्रामणीदेवी. लहानपणापासून त्याला शालेय शिक्षणात त्यांना विशेष रुची नव्हती. शाळेत शिकण्याचा विषय काढला, तर गदाधरांनी म्हटले, 'मला भातभाकरीची विद्या नको, ईश्वरदर्शन होईल अशी विद्या हवी'. देवपूजा, भजन, सत्संग यांची आवड होती. तरुण वयात दक्षिणेश्वर येथे राहून त्यांनी कालीमातेची उपासना केली. १८४३ साली पितृनिधनानंतर परिवाराचा भार त्यांचे थोरले भाऊ रामकुमार यांनी स्वीकारला. या घटनेचा गदाधराच्या मनावर खोल परिणाम झाला. १८५५ साली कलकत्त्याच्या अस्पृश्य कैवर्त समाजातील एका धनिक जमीनदार पत्नी राणी रासमणीने दक्षिणेश्वर मंदिराची प्रतिष्ठापना केली. रामकुमार त्या मंदिरात प्रमुख पुजारी बनले. १८५६ साली रामकुमारांच्या मृत्यूनंतर गदाधरांनी त्यांची जागा घेतली. रामकुमारांच्या मृत्यूनंतर रामकृष्णांची भावतन्मयता आणखी वाढली. कालीस ते आई व विश्वजननीभावाने पाहू लागले. या काळात ते देवीच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी व्याकूळ झाले.

त्यांचे गुरु तोतापुरी महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार साधना करून गदाधर 'परमहंस' पदाला प्राप्त झाले. याच गदाधरांना लोक 'रामकृष्ण परमहंस', या नावाने ओळखू लागले. श्रीराम आणि श्रीकृष्ण हे दोघेही आपल्या हृदयात असल्याचे ते सांगत. सहस्रो जणांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यातील काही पाश्चिमात्त्य देशांतीलही होते. त्यांच्या कार्याची धुरा स्वामी विवेकानंद यांनी समर्थपणे पेलली. १८५९ मध्ये वयाच्या तेविसाव्या वर्षी जयरामवाटी येथील रामचंद्र मुखोपाध्याय यांची पाच वर्षांची कन्या शारदामणी हिच्याशी त्यांचा विवाह झाला. पण लौकिक अर्थाने त्यांनी वैवाहिक जीवन स्वीकारले नाही. पुढे शारदामणी यांनी श्रीरामकृष्ण परमहंस यांचे शिष्यत्त्व स्विकारले आणि त्या शारदा देवी या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या.

साधना : श्रीरामकृष्ण परमहंस यांची ईश्वरभक्ती उत्कट होत चालली. मंदिराजवळच्या पंचवटीतील वडाच्या झाडाखाली ते रात्री जात आणि ध्यानधारणा करीत. रात्र व दिवस यांचे भान नष्ट होत असे. 'आई, दर्शन दे' असा आक्रोश ते करत असत. अशा वेळी तहानभुकेची वा अंगावरच्या वस्त्राचीही शुद्ध त्यांना राहत नसे. अखेर एके दिवशी आवेगाच्या भरात गाभाऱ्यातील कालीमातेचे खड्ग घेतले व ते मानेवर चालवणार, एवढ्यात जगन्मातेचे दर्शन त्यांना झाले. यानंतरचे त्यांचे सारे दैनंदिन जीवन ईश्वरानुभवाच्या प्रकाशात उजळून निघाले. विवाहानंतर पुन्हा त्यांनी मंदिराचे कामकाज पाहायला सुरुवात केली. १६ ऑगस्ट १८८६ या दिवशी कोलकाता येथे श्रीरामकृष्ण परमहंस यांनी देहत्याग केला.

श्रीरामकृष्ण परमहंस यांनी अन्य रूपांतील दैवी तत्त्व आणि भक्तीच्या विविध पद्धती जाणून घेण्यासाठी केलेले प्रयत्न !

१. श्रीरामाच्या दर्शनासाठी हनुमानाप्रमाणे ध्यास लागणे - रामकृष्ण अन्य रूपांतील दैवी तत्त्व आणि भक्तीच्या विविध पद्धती जाणून घेण्यासाठी पुढे जात राहिले. रामायणामध्ये श्रीरामाच्या दर्शनासाठी हनुमानाला ध्यास लागला होता, तसा त्यांनाही लागला. जेव्हा रामकृष्णांनी हनुमानाप्रमाणे श्रीरामाला अनुभवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच्या भक्तीमध्ये ते इतके तीव्रतेने गुंतले की, त्यांनी माकडाची लक्षणे आत्मसात करण्यास आरंभ केला. शेवटी त्यांना श्रीरामाचे दर्शन झाले.

२. गोपींप्रमाणे श्रीकृष्णाच्या दर्शनाची इच्छा होणे - 'भगवान कृष्णासमवेत रहातांना आणि त्याची भक्ती करतांना गोपींना त्याच्या दर्शनाची इच्छा होत असे, त्याप्रमाणे रामकृष्णांना श्रीकृष्णाच्या दर्शनाची इच्छा झाली. एका स्त्रीच्या दृष्टीकोनातून श्रीकृष्णाची भक्ती करतांना ते स्त्रीप्रमाणे दिसू आणि वागू लागले. त्यांचे वर्तन आणि दिसणे इतके स्त्रीप्रमाणे झाले की, इतर त्यांना प्रत्यक्षात स्त्री मानू लागले. त्यांनी स्वतःमध्ये एका स्त्रीप्रमाणे श्रीकृष्णाच्या दर्शनाची ओढ जागृत केली आणि शेवटी त्यांना श्रीकृष्णाच्या दर्शनाचा लाभ झाला.'

आपणही भगवंताविषयी प्रयत्नपूर्वक भाव वाढवून देवाच्या अनुसंधानात राहू शकतो. भाव वाढवण्यासाठी मन आणि बुद्धी यांच्या स्तरावर सतत कृती करत राहिल्यास, भाव निश्चितपणे वाढतो. कालीमातेचे महान उपासक 'रामकृष्ण परमहंस' यांच्या पावन चरणी अनंत कोटी कृतज्ञता !

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

## श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी यांची सनातन संस्थेच्या रामनाथी येथील आश्रमाला सदिच्छा भेट!

## घराघरात रामराज्य निर्माण केल्यास देशात रामराज्य येण्यास विलंब होणार नाही ! - श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी



**फोंडा (गोवा) । प्रतिन्निधी** - सनातन संस्था रामराज्य निर्माण करण्यासाठी कृतीशील आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. प्रत्येकाने स्वतः च्या घरात रामराज्य निर्माण केल्यास देशात रामराज्य निर्माण होण्यास विलंब होणार नाही, असे प्रतिपादन श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे २४ वे पू. मठाधिपती श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी यांनी केले. पू. स्वामीजी यांनी सनातन संस्थेच्या रामनाथी, फोंडा, गोवा येथील मुख्य आश्रमाला सदिच्छा भेट दिली, या प्रसंगी स्वामीजींनी वरील गौरवोद्गार काढले.

या मंगलप्रसंगी सनातनचे संत पू. पृथ्वीराज हजारे यांनी त्यांचे भावपूर्ण स्वागत केले. सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि सनातनचे साधक श्री. निषाद देशमुख यांनी पू. स्वामीजींना आश्रमदर्शन करतांना सनातनच्या राष्ट्र आणि धर्म प्रसाराच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली.

या वेळी श्री रामनाथ देवस्थान समितीचे अध्यक्ष श्री. वल्लभ कुंकळ्ळीकर, समितीचे विधी सल्लागार अधिवक्ता राजेश तळावलीकर, समितीचे सदस्य श्री. संजीव बाले आणि श्री. रुद्र कापडी, तसेच श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे गुरुजी श्री. संतोष आचार्य आणि श्री. वसंत आचार्य हेही उपस्थित होते. सनातन संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांनी स्वामीजींना आश्रमात येण्याविषयी श्री रामनाथ देवस्थान येथे जाऊन त्यांना प्रार्थना केली होती.

या वेळी पू. स्वामीजींचे गुरु श्रीमद् विद्याधिराज तीर्थ स्वामीजी यांच्या पादुकांचे पूजन सनातनचे साधक दांपत्य डॉ. पांडुरंग मराठे आणि सौ. मंगला मराठे यांनी केले. तसेच श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजींची पंचारती केली. यानंतर सनातनचे संत पू. पृथ्वीराज हजारे यांनी स्वामीजींचा भावपूर्ण सन्मान केला.

साधकांना मार्गदर्शन करतांना श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी म्हणाले, ''सनातन संस्था सनातन धर्माचे रक्षण करणे आणि सनातन धर्माचा प्रचार करण्यासाठी कटीबद्ध आहे, हे पाहून खूप आनंद होतो. सनातन संस्था 'इतरांचे जीवन आनंदी करून त्यामधून स्वतः आनंद घेणे' या तत्त्वानुसार चालते. सनातन संस्था सर्वांना संघटित करून त्यांच्यामध्ये ईश्वर सेवेद्वारे धर्मजागृती करत आहेत. सनातनचे साधक प्रतिदिन देवाची उपासना करतात आणि सर्वाचे शुभ चिंततात. सत्संगाचे हे महत्त्व आहे.

सनातनच्या साधकांनी भगवान श्रीकृष्ण आणि श्रीराम यांची उपासना अशीच अधिक भक्तीने करत रहावी. देवाशी आपण जोडलो गेल्याने देव आपल्या कार्यात येणार्या अडचणी दूर करत असतो. देवाची उपासना करणार्यांकडे दुसर्याचा पाहण्याचा दृष्टीकोनही सकारात्मक होत असतो. यामुळे ईश्वर भक्ती करणार्यांना कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसते. साधकांवर भगवंताचा कृपाशीर्वाद सतत राहो. त्यांचे कष्ट दूर होवो, अशी श्रीराम आणि श्री वीरविठ्ठल यांच्या चरणी प्रार्थना करतो.''

संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाला नुकतीच ५५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने २८ नोव्हेंबर २०२५ या दिवशी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते मठाच्या परिसरातील श्रीरामाच्या ७७ फूट उंच कांस्य धातूच्या भव्य मूर्तीचे अनावरण करण्यात आले होते.

## मनपाच्या दिरंगाईने बांधकाम व्यावसायिक हैराण, आशिमा मित्तल यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?

ॲड. महेश धन्नावात, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन

शहराच्या विकासात आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या बांधकाम क्षेत्राला सध्या मनपा प्रशासनाच्या उदासीनतेचा आणि दिरंगाईचा मोठा फटका बसत आहे. बांधकाम परवानगी आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी होणाऱ्या अक्षम्य विलंबामुळे अनेक मोठे प्रकल्प रखडले आहेत, ज्यामुळे विकासक आणि घर खरेदीदार दोघांनाही आर्थिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व प्रकारामुळे महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असून, याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे, कर्तव्यदक्ष प्रशासक म्हणून ओळख असलेल्या आशिमा मित्तल यांच्याकडे आयुक्तपदाचा कार्यभार असतानाही फाईल्स त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यास हेतुपुरस्सर विलंब केला जात असल्याने त्यांच्या कार्यक्षम प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, अशी शंका उपस्थित होत आहे.

वास्तविक पाहता, बांधकाम परवानगी आणि भोगवटा प्रमाणपत्र वेळेत देणे हे महानगरपालिकेचे केवळ कर्तव्यच नाही, तर कायद्याने बंधनकारक आहे. मुंबई उच्च न्यायालयाने **मेसर्स स्पेसकॉन विरुद्ध महाराष्ट्र शासन (रिट याचिका (एल) क्र. २९३३ ऑफ २०२४) या प्रकरणात नुकताच एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालात न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, विकास आराखडा प्रसिद्ध होण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या बांधकाम परवानग्या या 'कमिटेड डेव्हलपमेंट' म्हणून संरक्षित आहेत आणि नंतरच्या नियमावलीतील बदलांमुळे त्या अवैध ठरवता येणार नाहीत. कायद्यानुसार, एकदा विकासकाने सर्व अटींची पूर्तता करून बांधकाम पूर्ण केले की, त्याला भोगवटा प्रमाणपत्र नाकारता येत नाही. हा निकाल सर्व नियोजन प्राधिकरणांसाठी आणि महानगरपालिकांसाठी एकप्रकारे मार्गदर्शक तत्त्व आहे, ज्याचे पालन करणे अनिवार्य आहे.

परंतु, शहरात सध्या याच्या अगदी उलट परिस्थिती पाहायला मिळत आहे. अनेक विकासकांच्या फाईल्स किरकोळ कारणांवरून किंवा विनाकारण महिनोनमहिने विविध विभागांमध्ये प्रलंबित ठेवल्या जात आहेत. कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी फाईल्स वेळेवर पुढे सरकवत नाहीत, ज्यामुळे त्या अंतिम मंजुरीसाठी आयुक्तांपर्यंत पोहोचतच नाहीत. यामुळे एकीकडे विकासकांचा प्रकल्प खर्च वाढत आहे, तर दुसरीकडे ज्या नागरिकांनी आपल्या आयुष्याची पुंजी गुंतवून घर खरेदी केले आहे, त्यांना घराचा ताबा मिळण्यास विलंब होत आहे. या दिरंगाईमुळे महानगरपालिकेला विकास शुल्काच्या माध्यमातून मिळणारा कोट्यवधी रुपयांचा महसूलही बुडत आहे, ज्याचा थेट परिणाम शहराच्या विकास कामांवर होत आहे.

या संपूर्ण प्रकरणात एक गंभीर बाब समोर येत आहे. प्रशासक तथा आयुक्त आशिमा मित्तल या एक कार्यक्षम आणि प्रामाणिक अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. मात्र, असे असतानाही त्यांच्यापर्यंत फाईल्स पोहोचू न देणे, यात काही अधिकाऱ्यांचे संगनमत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही कर्मचारी आणि अधिकारी हेतुपुरस्सरपणे फाईल्सचा प्रवास थांबवून प्रशासनाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करत आहेत. आयुक्तांपर्यंत प्रकरणे न पोहोचल्यामुळे निर्णय प्रक्रियेत अडथळा निर्माण होत आहे आणि याचाच फायदा घेऊन काही अधिकारी आपली अकार्यक्षमता लपवत आहेत. यातून 'प्रशासक अकार्यक्षम आहेत' असे चित्र निर्माण करण्याचा हा एक सुनियोजित प्रयत्न असू शकतो.

सर्वोच्च न्यायालयाने अनेक निवाड्यांमध्ये स्पष्ट केले आहे की, शासकीय अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे नागरिकांचे किंवा शासनाचे नुकसान होत असेल, तर ते खपवून घेतले जाऊ शकत नाही. अशा प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून नुकसानीची रक्कम वसूल करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. महानगरपालिकेने या निर्दे शांचे गांभीर्याने पालन करण्याची वेळ आली आहे. जे अधिकारी किंवा कर्मचारी फाईल्स दाबून बसले आहेत, त्यांची ओळख पटवून त्यांच्यावर केवळ निलंबनाची कारवाई न करता, त्यांच्यामुळे महानगरपालिकेचे जे आर्थिक नुकसान झाले आहे, ते त्यांच्या वेतनातून वसूल केले पाहिजे.

ॲड. महेश धान्रवाट, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन, यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, महानगरपालिकेतील हा विलंब म्हणजे केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून, तो एक प्रकारचा संघटित भ्रष्टाचार असू शकतो. विकासकांना वेठीस धरून आर्थिक फायद्यासाठी फाईल्स थांबवल्या जात आहेत. उच्च न्यायालयाच्या **मेसर्स स्पेसकॉन** प्रकरणातील निकालानंतरही महानगरपालिका प्रशासन जर वेळेवर प्रमाणपत्रे देत नसेल, तर हा न्यायालयाचा अवमान आहे. प्रशासक आशिमा मित्तल यांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून, जे अधिकारी या दिरंगाईस जबाबदार आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यांच्या वेतनातून मनपाच्या नुकसानीची भरपाई करावी.

शहराच्या विकासाचा गाडा सुरळीत चालवायचा असेल आणि नागरिकांना उत्तम सुविधा द्यायच्या असतील, तर महानगरपालिकेचा महसूल वाढणे आवश्यक आहे. बांधकाम क्षेत्र हा महसुलाचा एक मोठा स्रोत आहे. त्यामुळे या क्षेत्राला प्रोत्साहन देण्याऐवजी अशा प्रकारे दिरंगाईच्या माध्यमातून खच्चीकरण करणे शहराच्या हिताचे नाही. प्रशासक आशिमा मित्तल यांनी या प्रकरणात कठोर भूमिका घेऊन, व्यवस्थेत पारदर्शकता आणि गतिमानता आणण्याची गरज आहे.

यासाठी, फाईल ट्रॅकिंग सिस्टीम अधिक प्रभावीपणे राबवणे, प्रत्येक फाईल कोणत्या अधिकाऱ्याकडे किती दिवस प्रलंबित आहे, याचा नियमित आढावा घेणे आणि विहित मुदतीत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच, जे अधिकारी चांगले काम करतात, त्यांना प्रोत्साहन देणेही तितकेच महत्त्वाचे आहे, जेणेकरून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेत एक सकारात्मक बदल घडेल.

जर महानगरपालिकेतील काही अधिकारी आणि कर्मचारी प्रशासक आणि विकास यांच्यामध्ये अडथळा निर्माण करत असतील, तर अशा 'गतिरोधकांना' वेळीच बाजूला करणे शहराच्या आणि नागरिकांच्या हिताचे ठरेल. केवळ तेव्हाच खऱ्या अर्थाने शहराचा विकास शक्य होईल आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नातही वाढ होईल.

शेवटी, उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे आणि प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. या कर्तव्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालता कामा नये. प्रशासक आशिमा मित्तल यांनी या प्रकरणात एक आदर्श घालून द्यावा आणि दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारावा, हीच शहरवासीयांची आणि बांधकाम व्यावसायिकांची अपेक्षा आहे.

# समायोजन वेळापत्रकाची मराठवाडा शिक्षक संघाने केली होळी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - मराठवाडा शिक्षक संघाने शासनाच्या संचमान्यता निकष व समायोजन वेळापत्रकाविरुद्ध आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाचा मुख्य उद्देश एस एस सी व एच एस सी बोर्ड परीक्षेच्या काळात नियोजित समायोजन प्रक्रिया तारखा बदलण्यात याव्यात आणि १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील ९वी व १0वी च्या किमान संख्येच्या अटींमुळे राज्यातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात फुगलेली आहे, त्यात संशोधन करून सुधारित निकष तयार करण्यात आले पाहिजे हा आहे. तसेच एच एस एस सी बोर्ड परीक्षेत मराठवाड्यातील काही जिल्ह्यात शिक्षकांवर सरसकट गुन्हे दाखल होत आहेत त्याची संपूर्ण चौकशी शिवाय सरसकट गुन्हे दाखल करू नयेत ही बाब अन्यायकारक व कायदेशीर नाही याची दखल घेत निर्दोष शिक्षकांवर होत असलेले गुन्हे तत्काळ मागे घ्यावे या प्रमुख मागणीसाठी मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी विभागीय उपसंचालक कार्यालय, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर येथे हे आंदोलन करण्यात आले. या वेळी केंद्रीय कार्यकारिणीचे



सहसचिव राजकुमार कदम, केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, रावसाहेब बोरसे, विनोद केनेकर, विलास चव्हाण, कृष्णा गोंडे, रवींद्र मगर, रामेश्वर गोराडे, संभाजी जाधव, सचिन मुसळे, सागर सुर्यवंशी, तुकाराम भवर, धनंजय भवर, अजित जाधव, विवेक पाटील, जितेंद्र शिंदे, पद्माकर पगार, संतोष सुरडकर, अरूणा चौधरी, सविता हिंगे, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे, रेखा साकळे यांच्यासह अनेक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होत. समायोजनाची नियोजन प्रक्रिया १३ फेब्रुवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येऊ नये या कालावधीत इयत्ता १0 वी व १२ वी परीक्षा सुरू आहे. सर्व शिक्षण क्षेत्रातील कर्मचारी परीक्षेच्या कामात व्यस्त आहेत, म्हणून आपण ही समायोजन प्रक्रिया परीक्षा संपल्यानंतरच घ्यावी. तसेच १0वी व १२वी परीक्षेत शिक्षकांवर सरसकट गुन्हे दाखल होत आहेत त्याची संपूर्ण चौकशी शिवाय सरसकट गुन्हे दाखल करणे अन्यायकारक व कायदेशीर नाही याची दखल घेत हा निर्दोष शिक्षकांवरील होत असलेला अन्याय तत्काळ थांबवावा अन्यथा मराठवाडा शिक्षक संघाने शासनाला ठणकावून इशाराच दिलेला आहे की येणाऱ्या काळात संपूर्ण मराठवाड्यात उग्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करण्यात येतील.

# राजुर गणपती येथे मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर संपन्न!

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - आधार क्रीडा शिक्षण व सांस्कृतिक मंडळ राजुर ,व जीवनस्पर्श नेत्रालय संभाजीनगर यांच्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर दिनांक १५ फेब्रुवारी २०२६वार रविवार रोजी संपन्न झाले, या शिबीरासाठी डॉ. प्रशांत घोरपडे , डॉ. एस. एस. घोरपडे, सागर भालेराव (B.sc optometry) रवि वाघमारे इत्यादी तज्ञ डॉक्टरांनी सहकार्य केले ,या शिबिराचा लाभ १४४




रुग्णांनी घेतला अशी माहिती आधार क्रीडा शिक्षण व सांस्कृतिक मंडळ राजुर गणपती या संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक अनिल वाघमारे यांनी दिली,

## पान १ वरुन

### शिवरायांच्या विचारांचा ...

तुषार निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.
छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे ऊर्जास्थान आहेत. जालना शहरात पूर्वी जेव्हा वाहने नव्हती, तेव्हा शिवजयंतीची मिरवणूक मोठ्या उत्साहात बैलगाडीतून निघत असे. आज काळ बदलला आहे, तंत्रज्ञान प्रगत झाले आहे. आता मोटारगाड्या आणि आधुनिक वाजंत्रीसह मिरवणुका निघतात. काळानुसार साजरीकरणाची पद्धत बदलली असली, तरी शिवरायांवरील निष्ठा तीच आहे. जयंतीच्या उत्सवापुरते मर्यादित न राहता, महापुरुषांचे उदात्त विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. आजच्या सोहळ्यात चिमुकल्यांना शिवरायांच्या वेशभूषेत पाहून मनाला विशेष समाधान वाटत आहे. अशा संस्कारांतूनच उद्याची पिढी घडणार आहे. असे प्रतिपादन उपमहापौर राजेश राऊत यांनी केले.
यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आणि त्यांचे विचार आजच्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. या महान कार्याचे स्मरण व्हावे आणि तो वारसा जपला जावा, याच मुख्य हेतूने या दोन दिवसीय कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी यावेळी शिवरायांना अभिवादन करत सर्व जालनेकरांना शिवजयंतीच्या मनापासून शुभेच्छा दिल्या. गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध शाहीर रामानंद उगले यांच्या शाहिरी शिवदर्शन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमातही शिवरायांच्या शौर्याच्या अनेक गाथा मांडल्या जाणार असल्याने जालनेकरांनी या कार्यक्रमालाही मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**'जागर शिवशाहीचा' सादरीकरणाने जालनेकर भारावले; शाहिरी कडाडली आणि अंगावर शहारे उमटले..!**

बुधवार दि.१८ फेब्रुवारी रोजी शाहीर अजिंक्य लिंगायत व त्यांच्या ११ कलावंतांनी सादर केलेल्या 'जागर शिवशाहीचा' या कार्यक्रमाने जालनेकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. डफावर थाप पडली, तुणतुण्याचा सूर छेडला गेला आणि 'छत्रपती शिवाजी महाराज, तुम्ही घ्या मानाचा मुजरा...' या ललकारीने टाऊन हॉलचा परिसर शिवमय झाला.
छत्रपती शिवरायांच्या बाललीलांचे वर्णन करणाऱ्या 'गोविंद घ्या कोणी गोपाळ घ्या' या शिवपाळण्याने उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. कार्यक्रमाचा परमोच्च बिंदू ठरला तो 'छत्रपती शिवाजी जाहले' हे शिवराज्याभिषेक गीत. या गीतावेळी शाहिरांचा बुलंद आवाज आणि वाद्यांची साथ यामुळे अंगावर रोमांच उभे राहिले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक गोंधळाने झाली. 'गोंधळाला ये...' आणि 'दार उघड बया आता दार उघड...' या गीतांनी सभागृहात चैतन्य निर्माण केले. केवळ गाणीच नव्हे, तर विस्मृतीत चाललेल्या 'तुमडी' या कलाप्रकाराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला' या गाण्यासोबतच कलाकारांनी सादर केलेली युद्धकला आणि लढतीची प्रात्यक्षिके पाहून प्रेक्षक थक्क झाले. महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या उपस्थितीत रंगलेल्या या सोहळ्यात शाहिरी परंपरेतून शिवरायांचे शौर्य मांडण्यात आले.
प्रत्येक पोवाड्यागणिक सभागृहात होणारा 'जय भवानी, जय शिवाजी' जयघोष वातावरणात नवचैतन्य निर्माण करत होता. तर सुरातून उलगडणारा शिवरायांचा देदीप्यमान इतिहास अनुभवण्यासाठी जालनेकरांनी सभागृहात गर्दी केली होती.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकतृत्वावर व शौर्यावर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रमाचे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उदघाटन करण्यात आले.

**गुरुवारी शाहिरी शिवदर्शन**

गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झी मराठी, सोनी मराठी आणि कलर्स मराठी फेम टीव्ही स्टार प्रसिध्द शाहिर रामानंद उगले, माधवी उगले-माळी, शाहीर अप्पासाहेब उगले आणि १६ सहकलावंताचा समुह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम शाहिरी शिवदर्शन सादर करणार आहेत.

### प्रशासनाच्या कडक ...

दोन्ही भागांतील परीक्षा केंद्रांवर शांततापूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे.
परतूर सह तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या हालचालींवर सीसीटीव्ही (उउढ्त) आणि पर्यवेक्षकांद्वारे बारकाईने लक्ष दिले जात आहे. प्रशासकीय धाकामुळे बाहेरील हस्तक्षेप पूर्णपणे बंद झाला असून परीक्षा शांततेत पार पडत आहेत अशी माहिती उपविभागीय अधिकारी, पद्माकर गायकवाड यांनी या भेटी दरम्यान दिली.

### जेईई परिक्षेत ...

खंडेलवाल यांच्या निवस्थानी भेट देऊन आयन खंडेलवालचे पुष्पगुच्छ देऊन मिठाई देत त्याच्या या यशाचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच आयन खंडेलवाल यास या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे अंकुश सोनवणे यांचाही गोरंटयाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी चेतन खंडेलवाल, रोहित भुरेवाल,अंकित आबड, पंडित उमेश सारस्वत,विजय पवार,किरण झारकंडे आनंद झारकंडे, शिवाजी शेजुळ,अक्षय झारकंडे,संतोष पंगुलवाले आदींची उपस्थिती होती.

### टेंभूर्णीचा पणी ...

जाऊन कायमची सुटका यातून होईल अशी हमी दिली.सोबत भेटसावत असलेला अतिक्रमण विषय वर काय परिस्थिती आहे या बद्दल आपले स्पष्ट मत बोलून दाखविले.
राष्ट्रीय पेय जल योजना जल जीवन योजने अंतर्गत खडकपूर्णा योजना पूर्ण होत असून जवळपास १६ कोटीची योजना असून या मुळे सगळ्या टेंभुर्णी पाणी भेटला असा आशावाद बोलून येत्या एका महिन्यात हे पाणी घराघरात भेटणार असल्या मुळे टेंभुर्णीकरांचे एक प्रकारे स्वप्न पूर्ती होणार आहे.
या वेळी आमदार संतोष दानवे यांनी आपले मनोगत व्यक्त करता वेळी टेंभुर्णी ला २४ तास पाणी भेटण्याचे स्वप्न पूर्ण माझ्या हाताने होत असल्याचे समाधान मला भेटत असल्याचे सांगून सगळी राहिलेले काम केल्या जाईल अशी ग्वाही दिली. पाणी पुरवठा योजना सह रोड करणे नाली करणे स्मशान भूमी असे अनेक कामाचे उद्घाटन करण्यात आले असून मला अजून तुमच्या सोबत चार वर्ष राहिलेली विकास काम पूर्ण करणे आहे. असे सांगून राहिलेला सगळे कामे केल्या जाईल असे सांगून माझ्या माध्यमातून राहिलेले सगळे कामे पूर्ण करून येणारी सगळी कामे पूर्ण करणार. सोबत आता असलेल्या कल्याण काळे यांचे एखादे विकास काम आहे का असा प्रश्न ही त्यांनी उपस्थित केला. मागील दहा वर्षा पासून केलेल्या विकास कामाची गोळा बेरीज त्यांनी सर्वांसमोर ठेवली. मी वीज पाणी रोड देणार ती माझ्या कामाची प्राथमिक यादी असून ती पूर्ण करणार असल्याचे आमदार संतोष दानवे यांनी प्रामुख्याने सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत सर्व सामान्य माणूस हा बिनधास्त भाजपा मागे असल्याचे आवर्जून त्यांनी सांगितले.
गांधी चमन येथे सर्व समाजासाठी सार्वजनिक भव्य सभागृह करण्याची घोषणा या वेळी त्यांनी विशेष करून केली. सोबत सगळ्या विकास कामाला गती दिल्या जाईल असे ही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन गौतम म्हस्के यांनी तर प्रास्ताविक रविंद्र उखर्डे यांनी केले तर आभार संतोष पाचे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठी गर्दी होती. भिकन भैया पठाण, बाळू देशमुख, आदींची आवर्जून उपस्थिती होती.



# स्वच्छतादूतांचा सन्मान हीच शिवरायांना खरी आदरांजली-इंजि. श्रीपाद रत्नपारखी

## मराठा महासंघातर्फे स्वच्छता कर्मचाऱ्यांना साड्या वाटप



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात अठरापगड जाती-धर्माच्या कष्टकऱ्यांना सन्मान दिला. त्यांच्याच विचारांचा वारसा जपत, जिल्हा स्त्री रुग्णालयाचा परिसर चकाचक ठेवणाऱ्या या भगिनींचा जिल्हा मराठा महासंघाच्या माध्यमातून साड्या वाटप करून सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. कष्टाची जाण असणारा समाजच प्रगती करू शकतो, त्यामुळे या स्वच्छतादूतांचा गौरव हीच महाराजांना आमची खरी आदरांजली आहे, असे प्रतिपादन राऊ युवा प्रतिष्ठानचे संस्थापक इंजि. श्रीपाद रत्नपारखी यांनी येथे बोलताना केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला मराठा महासंघाच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत, जिल्हा महिला रुग्णालयातील महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला, त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. रत्नपारखी बोलत होते. कार्यक्रमाला माजी नगरसेवक रमेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते गणेश तरासे, शुभम टेकाळे, कार्यालयीन अधीक्षक द्वारकादास चव्हाण, अखिलेश काबलीये, मंगेश मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. रत्नपारखी पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमीच कष्टकऱ्यांचा आणि महिलांचा सन्मान केला. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत, रुग्णालयाचा परिसर स्वच्छ ठेवून रुग्णांची सेवा करणाऱ्या या भगिनींचा सन्मान करताना आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे. त्यांचे कार्य हे समाजासाठी अत्यंत मोलाचे आहे. अध्यक्षीय समारोप करताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुदामराव गवारे म्हणाले की, जिल्हा महिला रुग्णालयाने 'मॅटर्नल हेल्थ' मध्ये महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे, याचे पूर्ण श्रेय या स्वच्छता भगिनींना आणि येथील कर्मचाऱ्यांना जाते. त्यांची मेहनत आणि तत्परतेमुळेच आम्ही स्वच्छतेचे आणि सेवेचे मानके उंचावू शकलो आहोत. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला झालेला हा सन्मान त्यांच्या कष्टाची पावतीच आहे.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख म्हणाले की, डॉ. गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णसेवेच्या बाबतीत जालना जिल्हा महिला रुग्णालय महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे. कर्मचारी आणि प्रशासनाच्या प्रयत्नामुळे आणि कामाची गती वाढविल्यास हे रुग्णालय निश्चितच महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आम्ही केवळ एक निमित्त आहोत, पण खरे काम या भगिनी करत आहेत. दिवस-रात्र रुग्णालयाची सेवा करणाऱ्या या महिलांना शिवजयंतीच्या शुभेच्छा देण्यासाठी आम्ही हा छोटासा प्रयत्न केला आहे. मराठा महासंघ नेहमीच अशा सामाजिक कार्यात अग्रभागी राहील, असे त्यांनी नमूद केले.

रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आमच्या कामाची दखल घेऊन शिवजयंतीच्या निमित्ताने आम्हाला साड्या दिल्या, यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे. महाराजांच्या जयंतीला या नवीन साड्या नेसून आम्ही उत्साहात सहभागी होऊ, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर जाधव आणि अनिकेत तुपे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संतांच्या संगतीतच जीवनाचे सार्थक - हभप अंजली घुंगरड

**परतूर । प्रतिनिधी -** ज्या घरामध्ये अतिथीचा योग्य मान राखला जातो आणि जिथे संतांच्या विचारांचा वास असतो, तेच घर खऱ्या अर्थाने धन्य आहे. भौतिक सुखे विकत घेता येतात, मात्र मनाचा परमानंद मिळवण्यासाठी पांडुरंगाच्या नामात दंग होऊन भक्तीच्या सोहळ्यात नाचावे लागते, असे प्रतिपादन ह.भ.प. अंजलीताई घुंगरड (राधामाधव वारकरी शिक्षण संस्था, परतूर) यांनी केले. तालुक्यातील राणी वाहेगाव येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित मंगळवारी रात्री कीर्तन सोहळ्यात त्या बोलत होत्या. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या 'धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ।।' या अभंगावर निरूपण करताना त्यांनी सुख आणि आनंद यातील सूक्ष्म फरक जनसामान्यांच्या भाषेत उलगडून दाखवला.

**सुख विकत घेता येते, आनंद नाही!**

कीर्तनात पुढे बोलताना अंजलीताई म्हणाल्या की, आजच्या आधुनिक युगात घरात टीव्ही, फ्रिज, एसी यांसारख्या भौतिक सुखसोयी आपण पैशाने विकत घेऊ शकतो. मात्र, समाधान आणि आनंद या भिन्न गोष्टी आहेत. पैशाने श्रीमंत असलेल्यांकडे सुख असेलही, पण संतांकडे भौतिक सोयी नसल्या तरी त्यांच्या जीवनात अखंड आनंद असतो. हा आनंद केवळ भक्ती आणि समाधानातूनच प्राप्त होतो.

**आई वडील आणि सैनिकांचे महत्त्व**

यावेळी त्यांनी सामाजिक विषयांना हात घालत उपस्थितांचे डोळे उघडले. देशासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या सैनिकांच्या त्यागाची जाणीव त्यांनी करून दिली. तसेच, ढगाआड गेलेला सूर्य पुन्हा दिसेल, पण एकदा निघून गेलेले आई-वडील पुन्हा दिसणार नाहीत, असे सांगत आई-वडिलांच्या सेवेचे महत्त्व विषद केले. पालकांची सेवा हीच खरी ईश्वरभक्ती असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.




**कामातही मुखी असावे 'हरीनाम'**

भक्ती म्हणजे केवळ देवळात बसणे नव्हे, तर आपले विहित कर्म करताना मुखाने देवाचे नामस्मरण करणे होय. हाती काम आणि मुखी राम या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने आपली कर्तव्ये पार पाडावीत. शेवटी केवळ आपली 'कर्मे'च आपल्या सोबत येतात. नातेवाईक आणि समाज केवळ स्मशानभूमीपर्यंत सोबत असतो, पण केलेल्या चांगल्या कर्माची शिदोरीच परलोकी कामाला येते, असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी दिला. या कीर्तन सोहळ्याला राणी वाहेगाव आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हभप अंजलीताई घुंगरड यांच्या ओघवत्या शैलीतील कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. राधामाधव वारकरी गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

# मातीचा सुगंध, हातात लॅपटॉप आणि डोक्यात स्वप्नं! हिवर्डीच्या विशाल भुतेकर यांचे गुजरातमध्ये सुवर्ण यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील हिवर्डी या छोट्याशा गावातून निघालेल्या जिद्दी युवकाने राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण यश संपादन करत जिल्ह्याचा मान उंचावला आहे. विशाल राजेश भुतेकर यांनी गुजरात येथे झालेल्या इंडियास्किल्स स्पर्धा २०२५-२६ पश्चिम विभागीय स्पर्धेत सॉफ्टवेअर अप्लिकेशन डेव्हलपमेंट या कौशल्य प्रकारात सुवर्णपदक पटकावले.

पश्चिम विभागातील पाच राज्यांतील नामांकित स्पर्धकांमध्ये झालेल्या कडव्या चुरशीच्या स्पर्धेत विशाल यांनी आपली बुद्धिमत्ता, अचूक कोडिंग कौशल्य, तार्किक विचारशक्ती आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर अव्वल क्रमांक मिळवला. मर्यादित वेळेत गुंतागुंतीच्या समस्यांवर कार्यक्षम व नाविन्यपूर्ण सॉफ्टवेअर उपाय तयार करणे ही स्पर्धेची मुख्य अट होती. कोडिंग, डिझाईन पॅटर्न, डेटाबेस व्यवस्थापन, युजर इंटरफेस डिझाईन आणि प्रेझेंटेशन या सर्व निकषांवर त्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. विशाल सध्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संगणक अभियांत्रिकी विभागाच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत आहेत. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्याने अत्याधुनिक माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण यश मिळवणे ही केवळ वैयक्तिक कामगिरी नसून संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या यशानंतर विशाल आता नोएडा (दिल्ली) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अंतिम स्पर्धेत पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यामुळे त्यांच्या कामगिरीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आपल्या यशाचे श्रेय देताना विशाल यांनी आई-वडील, प्राध्यापक आणि मार्गदर्शकांचे आभार मानले. मर्यादित साधनसामग्री असली तरी जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मोठी स्वप्ने पूर्ण करता येतात, असे ते म्हणाले. पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी अधिक जोमाने तयारी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हिवर्डी गावात त्यांच्या या यशामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून सत्काराची तयारी सुरू आहे. मातीचा सुगंध मनात आणि हातात लॅपटॉप घेऊन मोठी स्वप्ने पाहणारा हा ग्रामीण युवक आता अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे.

# जालना सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी व तपासणीसाठी येणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांची गैरसोय

## स्वतंत्र तपासणी कक्ष उपलब्ध करण्याची मागणी


**जालना । प्रतिनिधी -** जालना सिव्हिल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी व तपासणीसाठी येणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्याची मोठी गर्दी व गैरसोय होत आहे,वैद्यकीय अधिकारी दिव्यांग लाभार्थ्यांना बुधवारी आठवड्यातून एक दिवस तपासणीसाठी बोलवतात. त्यामुळे तपासणीसाठी दिव्यांग लाभार्थ्यांना वैद्यकीय अधिकारी तपासणीसाठी ठिकठिकाणी चक्रा मारायला पाठवतात.त्यामुळे दिवसेंदिवस दिव्यांग लाभार्थ्याची मोठी गैरसोय होत असून,स्वतंत्र तपासणी कक्ष व वैद्यकीय उपचार कक्ष उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे.अशी मागणी दिव्यांग लाभार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे.तसेच काही दिव्यांग लाभार्थ्यांकडे जुने ऑफलाइन प्रमाणपत्र आहे.त्यामुळे तहसील कार्यालयात ते प्रमाणपत्र स्वीकारले जात नाही.त्यामुळे दर महिन्याला



मिळणारे शासकीय पगारीचे अनुदान बंद झाले आहे. रिनीवलसाठी दिव्यांग लाभार्थी सिविल हॉस्पिटल जालना येथे चक्रा मारत असुन.तसेच सर्वप्रथम ऑनलाईन करण्यासाठी वेबसाईट सुद्धा वारंवार बंद होत आहे.त्यामुळे दिव्यांग लाभार्थ्याची दिवसेंदिवस गैरसोय होताना दिसून येत आहे. त्यामुळे शासन-प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दिव्यांग बांधवांचे होणारी गैरसोय टाळावी व पारदर्शक तपासणी व उपचार कक्ष या ठिकाणी स्वतंत्र उपलब्ध करून द्यावे.अशी मागणी वारंवार दिव्यांग लाभार्थी करीत आहे.तसेच या ठिकाणी दिव्यांग लाभार्थ्यांना मदतनीस म्हणून काही कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी.त्यांना होणारी गैरसोय टाळता येईल.त्यामुळे दिव्यांग लाभार्थ्यांना वेळोवेळी सेवा सुविधा उपलब्ध करून द्यावे अशी मागणी भारतीय जनता पार्टी अपंग विभाग तालुका अध्यक्ष लक्ष्मण राठोड वखारी जालना यांनी केली आहे.

# रोटरी रेनबोतर्फे महिला दिनानिमित्त 'साडी वॉकेथॉन' व घोषवाक्य स्पर्धा

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे ८ मार्च रोजी 'स्त्रीत्वाचा अभिमान जपुया, साडी वॉकेथॉन करूया' या संकल्पनेवर आधारित पारंपारिक वेशभूषेतील साडी वॉकेथॉन आणि घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




या स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांचा पारंपारिक पेहराव. यात नऊवारी किंवा सहावारी साडी नेसून महिला वॉकेथॉनमध्ये सहभागी होतील. केवळ चालणेच नव्हे, तर आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. उत्कृष्ट साडी नेसणाऱ्या आणि उत्साही सहभाग नोंदवणाऱ्या महिलांसाठी वैयक्तिक आणि सामूहिक अशा दोन्ही गटांत आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. महिला दिनाच्या निमित्ताने महिला आपल्या भावना आणि विचार घोषवाक्य स्पर्धे द्वारे मांडू शकणार आहेत.

केवळ मनोरंजन आणि स्पर्धाच नव्हे, तर महिलांच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षेसाठी यावेळी 'सी. पी. आर. जीवन संजीवनी' प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत जीव कसा वाचवावा, याचे प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत यावेळी दिले जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख सौ. निर्मला सुरेश साबू, सौ. नेहा पाटणी, डॉ. तरुणा छाबडा आणि सौ. संगीता गुप्ता ह्या परिश्रम घेत आहेत. इच्छुक महिलांनी श्री साई डायग्नोस्टिक (पोस्ट ऑफिस रोड), गादिया हॉस्पिटल (भोकरदन रोड), अथर्व दातांचा दवाखाना (टाऊन हॉल) सौ. कीर्ती अग्रवाल (उडान ग्रुप) येथे दि. १ मार्चपर्यंत नावनोंदणी करावी.

जालना शहरातील महिलांनी या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्लबच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत आणि सचिव पंकज लड्डा यांनी केले आहे.

# महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास शक्य

## विजया रहाटकर यांचा आशावाद; 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-२०२६'मध्ये महिला समृध्दीचा निर्धार

**नवी दिल्ली -** आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ एक तांत्रिक साधन नसून शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू ठरत आहे. आगामी काळात एआयमुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असून महिलांनी या तंत्राच्या केवळ 'वापरकर्त्या' म्हणून न राहता संशोधक आणि निर्माते होऊन नव्या परिवर्तनाचे नेतृत्व करावे. महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास होउ शकेल असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केला.

दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग , आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था (युनिटार) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एआय आणि आर्थिक शक्ती - महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा या विषयावर आयोजित विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोपीय भाषणात त्या बोलत होत्या. मंचावर युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि संगीतकार निर्माता कार्तिक शाह उपस्थित होते.

या समिटमधील चर्चासत्र हा केवळ संवाद नसून ती एक चळवळ आहे. भारतीय महिलांनी नेहमीच परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे, असा दाखला देऊन श्रीमती रहाटकर पुढे म्हणाल्या, एआय सारख्या नव्या तंत्रज्ञानातही महिला मागे राहणार नाहीत. त्यासाठी त्यांना अनुरुप प्रक्षिशण व योग्य अशी इकोस्टिटीम दिली जाईल. महिलांची केवळ भागीदारी अपेक्षित नसून त्यांच्याकडे या तंत्राची मालकी आली पाहिजे. त्यासाठी महिलांना 'एआय साक्षरता' प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. यामध्ये डेटा संरक्षण, डिजिटल नीतिमत्ता आणि सायबर सुरक्षेची सखोल समज आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ घोषणांऐवजी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देत सूक्ष्म व लघुउद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याचे आवाहन करुन राष्ट्रीय महिला आयोग त्यासाठी कृतीशील प्रयत्न करेल, असा विश्वास त्त्यांनी दिला. या सत्रात श्री. ब्रिजेश सिंह यांनी महिलांना भेडसावणाऱ्या डिजिटल धोक्यांवर प्रकाश टाकला. एआयची निर्मिती प्रामुख्याने पुरुषप्रधान मजकूर आणि डेटाच्या आधारे झाल्याने त्यामध्ये संवेदनशीलता, न्याय आणि समतेचा अभाव दिसून येतो. ही प्रणाली केवळ कार्यक्षमतेच्या 'हायपर-ऑप्टिमायझेशन'वर लक्ष केंद्रित करते, ज्याचा विपरित परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होत आहे. आकडेवारीनुसार, 'डीपफेक' तंत्रज्ञानाच्या ९१ टक्के बळी महिलाच आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांविरोधात होणारे अत्याचार, डीपफेकसारखे प्रकार यावर निश्चित आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आपण काही बाबी नक्की करु शकतो. सोशल मीडिया कंपन्यांनी 'सेफ हार्बर' नियमांचा आधार घेत जबाबदारी झटकू नये, असे सांगत त्यांनी 'प्लॅटफॉर्म जबाबदारी'वर भर दिला. मुळात हा विषय प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीचा आहे. जिथे प्लॅटफॉर्म जबाबदारी स्वीकारत नाहीत, तिथे सरकारने हस्तक्षेप करणं आवश्यक आहे. भारतामध्ये २०२१ मधील नियमांनुसार पीडित व्यक्तींना नोडल अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची सुविधा आहे आणि ठराविक कालावधीत आक्षेपार्ह सामग्री हटविणे कंपन्यांना बंधनकारक आहे. तसेच एआय-निर्मित प्रतिमांवर 'वॉटरमार्क' सक्तीचे करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली . युनायटेड नेशन्स इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग अँड रिसर्चच्या मिहोको कुमामोटो यांनी आपले विचार मांडताना क्षमता बांधणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर दिला. यामुळे महिलांना एआय-आधारित जागतिक संधींचा लाभ घेता येईल. यामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास व्यक्त करुन त्या म्हणाल्या, युनीटारला भारत सरकार, राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ, तसेच इतर संयुक्त राष्ट्र भागीदारांसोबत व्यावहारिक समृध्दीसाठी एआय हे उदिष्ट ठेऊन पुढील कार्यक्रम अंमलात आणण्याची इच्छा आहे. हे कार्यक्रम स्थानिक वास्तवावर आधारित असतील, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ देतील आणि इतर देशांना उपयोगी पडेल असे पुराव्यावर आधारित मॉडेल उभारतील. म्हणूनच, जेव्हा ग्लोबल साउथमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची कथा लिहिली जाईल, तेव्हा महिलांचा उल्लेख तळटीपेत न राहता, सामायिक आणि सर्वसमावेशक समृद्धीच्या मुख्य अध्यायाच्या लेखिका म्हणून त्यांची नोंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनच्या अत्सुको ओकुडा यांनी द्वितीय आणि तृतीय शहरांमधील महिलांसाठी डिजिटल समावेशकता वाढवण्याची आणि डिजिटल दरी कमी करण्याची गरज अधोरेखित केली. एआय नवसंशोधनाचे रूपांतर महिलांच्या प्रत्यक्ष आर्थिक सक्षमीकरणात करण्यासाठी एक 'प्रॅक्टिकल रोडमॅप' तयार करण्याबाबत भारताने पुढाकार घ्यावा असेही सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.